मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रारूप प्रभाग रचनेवर अवघ्या दोन हरकती

## एक सूचना प्रभाग क्रमांक आठ आणि दुसरी सूचना प्रभाग क्रमांक 21 बाबत

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर पाच दिवसांत केवळ दोन सूचना व हरकती आल्या आहेत. एक सूचना प्रभाग क्रमांक आठ आणि दुसरी सूचना प्रभाग क्रमांक २१ बाबत आहे. हरकती व सूचना चार सप्टेंबरपर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. मतदान केंद्राच्या निश्चितीसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रशासनाने महापालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN या संकेतस्थळावर २२ ऑगस्ट रोजी प्रारूप प्रभाग रचनेचा नकाशा प्रसिद्ध केला. महापालिका भवनाच्या आवारात तसेच, सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या आवारात नकाशे व माहिती प्रसिद्ध केली आहे. नागरिक नकाशे व माहिती पाहताना दिसतात. मात्र, फेब्रुवारी २०१७ प्रमाणेच प्रभाग रचना असल्याने हरकतींचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे.




प्रारूप प्रभाग रचनेबाबत पाच दिवसांत केवळ दोन हरकती प्राप्त झाल्या आहेत. प्रभाग क्रमांक आठचे नाव इंद्रायणीनगर-संतनगर असे असावे, अशी सूचना हनुमंत लांडगे यांनी केली आहे. प्रभाग क्रमांक २१ मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असल्याने तो प्रभाग राखीव करावा. त्याप्रमाणे या प्रभागाची रचना करावी, अशी सूचना भीम संग्राम सामाजिक संघटनेचे राहुल वडमारे यांनी केली आहे.

मतदान केंद्राची निश्चिती करण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात कार्यकारी अभियंता, (स्थापत्य, विद्युत) यांची नियुक्ती केली आहे. उपअभियंता, कनिष्ठ अभियंत्यांची सेक्टर अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. या अधिकाऱ्यांची निवडणूक प्रक्रिया पार पडेपर्यंत नियुक्ती कायम ठेवली जाणार आहे. खासगी इमारतीमध्ये मतदान केंद्र, एका इमारतीमध्ये पाचपेक्षा अधिक मतदान केंद्र असल्यास अधिकाऱ्यांनी इमारतीच्या ठिकाणी जाऊन तपासणी करावी. १५ दिवसांत निवडणूक प्रभागनिहाय मतदान केंद्र निश्चितीचा अहवाल सादर करण्याचा आदेश महापालिका निवडणूक विभागाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिला आहे.

### शहरात 2300 मतदान केंद्रे

» महापालिकेची निवडणूक २०११ च्या १७ लाख २७ हजार ६९२ या लोकसंख्येप्रमाणे होणार आहे. तेवढीच मतदारसंख्या अपेक्षित धरून मतदान केंद्र निश्चित करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. २०१७ च्या निवडणुकीमध्ये एक हजार ६०८ मतदान केंद्रे होती. आगामी निवडणुकीसाठी अंदाजे दोन हजार ३०० इतकी मतदान केंद्रे अपेक्षित आहेत. एका मतदान केंद्रावर ७०० ते ८०० मतदार असणार आहेत.

# कुदळवाडी, चिखली येथे भव्य हिंदू मिलन समारंभ संपन्न

## समाजातील विविध प्रश्नांवर प्रकाश टाकत एकत्रितपणे सामाजिक कार्य करण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

कुदळवाडी, चिखली येथील चंद्रभागा लॉन्समध्ये हिंदू मिलन समारंभाचे भव्य आयोजन करण्यात आले. समाजातील एकता, बांधिलकी आणि परस्पर सलोखा वृद्धिंगत करण्याच्या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याचे मुख्य अतिथी म्हणून हिंदू युवा वाहिनी प्रदेश प्रभारी व उत्तर प्रदेश विधानसभेचे माजी आमदार राघवेंद्र प्रताप सिंह यांनी विशेष उपस्थिती लावली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर




भाषणातून समाजातील ऐक्य, परस्पर सहकार्य आणि नव्या पिढीला योग्य दिशा देण्याचे महत्व अधोरेखित केले. समाजातील विविध प्रश्नांवर त्यांनी प्रकाश टाकत एकत्रितपणे सामाजिक कार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला उत्तर भारतीय समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान व उत्साह दिसून येत होता. एकत्र येऊन समाजाच्या हितासाठी काम करण्याची भावना या सोहळ्याच्या माध्यमातून प्रकर्षाने दिसून आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक मंडळ, ग्रामस्थ तसेच विविध मान्यवरांचे विशेष प्रयत्न लाभले. समाजातील बांधवांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद व आपुलकीमुळे कार्यक्रमाला एक वेगळेच स्वरूप प्राप्त झाले.

या सोहळ्यात उपस्थित मान्यवर, कार्यकर्ते व ग्रामस्थ यांनी आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

# पीओपी व शाडू मातीच्या मूर्तींची नोंद ठेवा

## विसर्जन घाटांची पाहणी केल्यानंतर आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज सकाळी मोशी खाणीसह शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांची पाहणी केली. विसर्जनाच्या दिवशी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी विसर्जन घाटांवर आवश्यक सोयीसुविधांसह पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात यावी, असे निर्देशही आयुक्त सिंह यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. विशेष म्हणजे पीओपी व शाडू मातीच्या मूर्तींची नोंद ठेवा असेही आयुक्त शेखर सिंह यांनी स्पष्ट केले आहे.



या पाहणी दौऱ्यावेळी महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उपायुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उद्यान अधिक्षक योगेश वाळुंज, कार्यकारी अभियंता हरविंदसिंह बन्सल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह यांच्या पाहणी दौऱ्याला मोशी खाण येथून सुरुवात झाली. यावेळी आयुक्त सिंह म्हणाले, 'मोशी खाणीकडे येणाऱ्या रस्त्यावर मुरूम टाकून त्याची डागडूजी करावी. याठिकाणी महापालिकेच्या आठही प्रभागांतून येणाऱ्या गणेश उत्सव मूर्तींच्या विसर्जनासाठी पुरेसे कर्मचारी नियुक्त करण्यात यावेत. आरोग्य विभाग व सुरक्षा रक्षकांची पथके येथे कार्यरत ठेवावीत. आवश्यक तेथे सीसीटीव्हीसह लाईट, मंडप, पिण्याचे पाणी आदी व्यवस्था करण्यात यावी,' असेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.मोशी खाणीनंतर आयुक्त सिंह यांनी मोशी येथील इंद्रायणी नदी विसर्जन घाट, पिंपरी येथील पवना नदीवरील झुलेलाल घाट, सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाट अशा प्रमुख घाटांची पाहणी केली.

यावेळी आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'विसर्जन घाटांवर गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करा. विसर्जन घाटांवर पुरेसे कर्मचारी व यंत्रणा कार्यान्वित ठेवा. निर्माल्यकुंडाची व्यवस्था करा. कृत्रिम विसर्जन हौदांच्या स्वच्छतेला प्राधान्य द्या. घाटांवर सुशोभीकरण करा. दिशादर्शक फलक लावा. जीवनरक्षक, अग्निशमन विभागाचे जवान व आपदा मित्र यांची नियुक्ती करा. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित ठेवा. आवश्यक तेथे सीसीटीव्ही लावा. विसर्जन घाटाकडे येणाऱ्या रस्त्यांची डागडूजी करा,' असे निर्देश देखील आयुक्त सिंह यांनी संबंधित विभागप्रमुख, क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.

**पीओपी व शाडू मातीच्या मूर्तींची नोंद ठेवा..**

» आयुक्त शेखर सिंह यांनी गणेश विसर्जन घाटांवर विसर्जन केल्या जाणाऱ्या उत्सव मूर्तींची नोंद ठेवण्याचे निर्देशही संबंधित विभागांना दिले आहेत. विसर्जनासाठी आलेल्या मूर्तींची नोंद ठेवताना ती पीओपीची आहे की शाडू मातीची आहे, मूर्तीची उंची पाच फूट किंवा त्यापेक्षा जास्त आहे का, याप्रमाणे तिची नोंद करून ठेवावी, असे आयुक्त सिंह म्हणाले.

# महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

## दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न; अध्यक्षस्थानी प्रशासक शेखर सिंह

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक शेखर सिंह होते. यावेळी विविध विकास कामांना आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली. शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत पीएमपीएल संस्थेस विविध पासेसची रक्कम अदा करणे, ड गटातील वाहनांच्या दुरुस्ती कामी निविदा कालावधीत मुदतवाढ देणे, प्रभाग क्रमांक ८ मधील विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे या कामाच्या सुधारित अंदाजपत्रकात मान्यता देणेकामी महानगरपालिकेच्या सभेकडे शिफारस करण्यात आली.

अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील पाणीपुरवठा दुरुस्ती व नवीन जलवाहिन्या टाकण्याकरिता खोदण्यात आलेल्या चेंबरचे डांबरीकरण करणे, पिंपरी चिंचवड मनपा शास्त्रातील दत्तनगर दिघी येथील मंडपाचे सभामंडप बांधणे, ह क्षेत्रीय कार्यालय परिसरातील स्वच्छतागृह देखभाल दुरुस्ती व साफसफाईच्या कामाकरिता लहान जेटिंग मशीन खरेदी करणे, ह क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरीकरणासाठी चार रिक्षा



टेम्पो वाहन इंधन व वाहन चालकास प्रतिदिन भाड्याने घेण्याच्या निविदेस मुदतवाढ देण्यात आली.


पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे बाबत पीओपी गणेश मूर्तींचे शास्त्रोक्त विघटन करणेकामी पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत अमोनियम बायकार्बोनेट या रसायनाची शासकीय दराने खरेदी करणे, महाराष्ट्र शासन नगरपरिषद प्रशासन संचालनायमार्फत उपलब्ध होणारी रिसायकल वाहने पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत करणे व सन २०-२५ चे अंदाजपत्रकामध्ये वाढ घट करून तरतूद करणे, फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध उद्यान देखभाल करणे, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अवकारिका चित्रपट दाखविण्यासाठी आलेल्या खर्चास मान्यता देणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# पुण्यात गणेशोत्सवात मद्यविक्री बंद!

## संपूर्ण जिल्ह्यात गणेश चतुर्थी (27 ऑगस्ट) ते अनंत चतुर्दशी (7 सप्टेंबर) 10 दिवस "ड्राय डे"

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील खडक, विश्रामबाग आणि फरासखाना या मध्यवर्ती भागातील पोलिस ठाण्यांच्या हद्दीत गणेश चतुर्थीपासून अर्थात २७ ऑगस्ट ते अनंत चतुर्दशीपर्यंत म्हणजेच ७ सप्टेंबर या काळात ११ दिवस संपूर्ण मद्यविक्रीवर बंदी असणार आहे. त्याचप्रमाणे, संपूर्ण जिल्ह्यात गणेश चतुर्थी आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी मद्यविक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले आहेत.



मध्यवर्ती भागात अनेक मानाचे आणि प्रमुख गणपती मंडळे आहेत. या मंडळांचे देखावे पाहण्यासाठी मोठ्या संख्येने गणेशभक्तांची गर्दी होते. कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. बुधवारी (दि. २७) श्री गणेशाची प्रतिष्ठापना होणार आहे, तर ७ सप्टेंबर रोजी विसर्जन होणार आहे. या दोन्ही दिवशी संपूर्ण जिल्ह्यात मद्यविक्रीवर बंदी असेल. तसेच, ७ सप्टेंबर रोजी महापालिका हद्दीतील सर्व दारूची दुकाने बंद राहणार आहेत. ज्या भागात ५ व्या आणि ७ व्या दिवशी विसर्जन मिरवणुका काढल्या जातात, त्या दिवशी संबंधित भागातील मद्यविक्री बंद ठेवली जाईल. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर दारूबंदी कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**गुन्हे प्रतिबंधासाठी उपाययोजना..**

गणपती मंडळांची आरास पाहण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या गर्दीमुळे चोऱ्या होण्याची शक्यता अधिक असते. गुन्हे प्रतिबंधासाठी पथके नेमण्यात आली आहेत. ॲन्टी चेन स्नॅचिंग पथक, वाहनचोरी विरोधी पथक, मोबाइल चोरीविरोधी पथक, महिला व बाल सुरक्षा (छेडछाड विरोधी) पथक अशी पथके नेमण्यात आली असून, गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे यांच्या अधिपत्याखाली १ सहायक पोलिस आयुक्त, ६ पोलिस निरीक्षक, ३२ सहायक पोलिस निरीक्षक / पोलिस उपनिरीक्षक, २५३ पोलिस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे.

### ध्वनिक्षेपक...

» जिल्हाधिकारी डुडी यांच्याकडून ध्वनिक्षेपक व ध्वनीवर्धकास ३० ऑगस्ट ते ४ सप्टेंबर आणि ६ सप्टेंबर असे ७दिवस-रात्री १२ पर्यंत परवानगी देण्यात आली आहे.

### बंदोबस्त मनुष्यबळ...

» गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी ६ व ७ सप्टेंबर २०२५ रोजी पुणे पोलिस आयुक्तांतर्गत पोलिस आयुक्तासह सह पोलिस आयुक्त, सर्व अपर पोलिस आयुक्त, तसेच १० पोलिस उपायुक्त, २७ सहायक पोलिस आयुक्त, १५४ पोलिस निरीक्षक, ६१८ सहायक पोलिस निरीक्षक/उपनिरीक्षक, ६२८६ अंमलदार, १६ स्ट्रायकिंग, १४ क्युआरटी हिट, ७ बीडीडीएस पथके, ११०० होमगार्ड व १ एसआरपीएफ कंपनी असा बंदोबस्त लावण्यात आला आहे.

### विसर्जनाचेही नियोजन

» पहिल्या दोन-तीन दिवसांत येथे येणारे व जाणारे यांच्या संख्येवरून नेमका अंदाज येईल. त्यावरून पुढील दिवसांमध्ये आणखी काय नियोजन करायचे हे निश्चित करण्यात येणार आहे. याशिवाय शेवटच्या दिवशी विसर्जन मिरवणुक पाहण्यासाठी लक्ष्मी रस्त्यावर प्रचंड गर्दी होते, त्यामुळे बेलबाग चौकाच्या आधीपासून ते थेट अलका टॉकीज चौक आणि विसर्जन ठिकाणावर पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

# गणेश चतुर्थीनिमित्त पुण्यातील वाहतुकीत बदल

## छत्रपती शिवाजी रस्त्यावरील गाडगीळ पुतळा चौक ते मंडईतील गोटीराम भैया चौक हा मार्ग वाहतुकीस बंद

**पुणे | प्रतिनिधी**

गणेश चतुर्थीनिमित्त बुधवारी (27 ऑगस्ट) मध्यभागातील वाहतुकीत बदल करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. शिवाजी नगर येथील डेंगळे पूल, कसबा पेठेतील फडके हौद चौक ते जिजामाता चौक, फुटका बुरूज, अप्पा बळवंत चौक ते हुतात्मा चौक (बुधवार चौक), मोती चौक, मंगला चित्रपटगृहासमोरील रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. मुंढव्यातील केशवनगर परिसरात मूर्तीखरेदीसाठी भाविकांची गर्दी होते. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (26 ऑगस्ट) या भागात वाहतूक बदल करण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने जाणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.



**बंद मार्ग आणि पर्यायी मार्ग...**

छत्रपती शिवाजी रस्त्यावरील गाडगीळ पुतळा चौक ते मंडईतील गोटीराम भैया चौक हा मार्ग वाहतुकीसबंद असणार आहे.

वाहनांनी संताजी घोरपडे पथ, कुंभारवेस चौक, मंगळवार पेठेतील शाहीर अमर शेख चौक यामार्गाने जावे.

जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी पुतळा चौक, खुडे चौकमार्गे कुंभारवाड्याकडे जाणाऱ्या वाहनांनी छत्रपती शिवाजी पुलावरून डावीकडे वळून संताजी घोरपडे मार्गाने कुंभारवेसकडे जावे.

### पीएमपी बसमार्गात बदल

» शिवाजीनगर बसस्थानकातून स्वारगेटकडे जाणाऱ्या पीएमपी बसमार्गात बदल करण्यात आला आहे. शिवाजीनगरकडून स्वारगेटकडे जाणाऱ्या पीएमपी बस स. गो. बर्वे चौक (मॉडर्न कॅफे), जंगली महाराज रस्ता, डेक्कन जिमखाना, टिळक रस्तामार्गे स्वारगेटकडे जातील. महापालिका भवन परिसरातून स्वारगेटकडे जाणाऱ्या पीएमपी बस जंगली महाराज रस्त्याने जातील.

### मूर्ती खरेदीसाठी पार्किंगव्यवस्था

» कामगार पुतळा चौक ते छत्रपती शिवाजी पुतळा-संताजी घोरपडे पथ ते गाडगीळ पुतळा-टिळक पूल ते भिडे पूल, नदीपात्रातील रस्ता-मंडईतील वाहनतळ-छत्रपती शिवाजी रस्त्यावरील शाहू चौक ते राष्ट्रभूषण चौक.

सारसबाग परिसरातील स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा चौक ते समाधान भेळ केंद्र परिसरात सर्व प्रकारची वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. वाहनचालकांनी मित्रमंडळ चौक ते पाटील प्लाझा, नीलायम चित्रपटगृहाजवळ वाहने लावावीत.

# गणेशोत्सव काळात ‘पीएमपी’च्या जादा बस

## तिकीट दर दहा रुपये जास्त; पासधारकांसाठी रात्री 12 वाजेपर्यंतच सेवा वैध राहणार

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या कालावधीत पुणे शहरात उपनगर आणि बाहेरगावांहून गणपती दर्शन आणि रोषणाई पाहण्यासाठी होणारी नागरिकांची गर्दी लक्षात घेऊन पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत दोन टप्प्यांत बसच्या ७८८ फेऱ्या जादा सोडण्याचा निर्णय घेतला आहे. जादा बसेससाठी प्रचलित तिकीट दरापेक्षा दहा रुपये जादा आकारला जाणार असून, पासधारकांसाठी रात्री १२ वाजेपर्यंतच सेवा वैध राहणार असल्याचे पीएमपी प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.



पहिल्या टप्प्यात २९, ३० ऑगस्ट आणि ५ सप्टेंबर या तीन दिवसांत १६८ जादा बस फेऱ्या, तर दुसऱ्या टप्प्यात ३१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर आणि ६ सप्टेंबर या कालावधीत ६२० जादा बस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. स्वारगेट ते निगडी या मार्गावर रात्रीच्या वेळी नियमित फेऱ्यांव्यतिरिक्त विशेष जादा फेऱ्या असणार आहे, अशी माहिती पीएमपी प्रशासनाकडून देण्यात आली.

पुण्यात गणेशोत्सवात भाविकांची गर्दी होत असते. त्यामुळे पीएमपी प्रशासनाने गणेशोत्सव काळात गर्दीच्या ठिकाणी मागणीनुसार जादा बस सोडण्याचे नियोजन केले आहे. या जादा बसेसाठी प्रचलित तिकीट दरापेक्षा दहा रुपये जादा दर आकारला जाणार आहे. पासधारकांसाठी रात्री १२ वाजेपर्यंतच सेवा वैध राहणार आहे. दरम्यान, गणेशोत्सव कालावधीत शहरातील शिवाजी रोड, बाजीराव रोड, लक्ष्मी रोड, टिळक रोड हे रस्ते सायंकाळी बंद राहतील. त्यामुळे या मार्गावरील बस पर्यायी मार्गाने चालवल्या जाणार आहेत, असे पीएमपीचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे यांनी सांगितले.

### स्थानक आणि जादा बसची संख्या

- निगडी – ७०
- चिंचवडगाव ३५
- भोसरी ६२
- पिंपळे गुरव २०
- सांगवी १५
- आकुर्डी रेल्वे स्टेशन १६
- चिंचवड गाव मार्गे डांगे चौक – ३०
- मुकाई चौक रावेत १२
- चिखली/संभाजीनगर १०

एकूण – २७०

# पहिल्याच दिवशी 1000 एकर जागेचे संमतीपत्र

## पुरंदर विमानतळासाठी 760 शेतकऱ्यांनी दिली परवानगी; 30 टक्के जागेची संमती

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पहिल्याच दिवशी सात गावांमधील 760 शेतकऱ्यांनी सुमारे 1070 एकर जागेची संमतीपत्रे जिल्हा प्रशासनाकडे सादर केली आहेत. यामुळे विमानतळाच्या भूसंपादनाचा मार्ग सुकर झाला आहे.



या विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये 2 हजार 673 हेक्टर जागा निश्चित करण्यात आली होती. मात्र, राज्य शासनाने भूसंपादन क्षेत्रात कपात करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, आता केवळ 1 हजार 285 हेक्टर म्हणजेच 2 हजार 800 एकर भूसंपादन करण्यात येणार आहे.

भूसंपादनासाठी जिल्हा प्रशासनाकडून 25 ऑगस्टपासून संमतीपत्रे स्वीकारली जात आहेत. संमतीपत्र सादर करण्यासाठी 21 दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना विकसित भूखंडासह चारपट मोबदलाही देण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले, “सोमवारपासून संमतीपत्रे घेण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी सुमारे 760 जागा मालकांनी संमतीपत्रे दिली असून, ती सुमारे 1070 एकर जागा आहे. भूसंपादन करण्यात येणाऱ्या सात गावांपैकी पारगावमधून सर्वाधिक, म्हणजेच 320 जागा मालकांनी संमतीपत्रे दिली आहेत. ज्या जागा मालकांनी भूसंपादनासाठी संमतीपत्रे सादर केली आहेत, त्यांचा परतावा निश्चित झाला आहे.

**येथे संमतीपत्रे सादर करता येतील**

भूसंपादनासाठी संमतीपत्रे देण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, सासवड, कुंभारवळण रोड; उपजिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी क्र. 1, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, बी-विंग पहिला मजला; आणि उपजिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी क्र. 3, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, ए-विंग पहिला मजला या कार्यालयांमध्ये सकाळी 10 ते 5 या वेळेत व्यवस्था करण्यात आली आहे.

विमानतळासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जागेपैकी जवळपास चाळीस टक्के जागा जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आली आहे. एखाद्या प्रकल्पासाठी एकाच दिवसात एवढी संमतीपत्रे सादर होण्याचा हा एक विक्रम मानला जात आहे.

### शेतकऱ्यांवर दबाव आणणाऱ्यांवर कारवाई होणार

जिल्हाधिकाऱ्यांनी पुढे सांगितले की, ‘विमानतळासाठी संमतीपत्रे सादर करणाऱ्या जागा मालकांवर कोणी दबाव आणत असेल, तर त्यांच्यावर प्रशासनामार्फत कायदेशीर कारवाई केली जाईल. जमीन मालकांना त्यांच्या जमिनीबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्यामुळे अधिकाधिक बाधित जागा मालकांनी वेळेत संमतीपत्रे सादर करून आपला परतावा निश्चित करून घ्यावा,’ असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.संमती दिल्यानंतर संबंधित व्यक्ती व जमीन मालकांना एमआयडीसी पुनर्वसन धोरणानुसार लाभ देण्यात येणार आहे. संमतीच्या प्राधान्यक्रमानुसार ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ यानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.